N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** शिरूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0242 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**21/03/2026 07:03

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिंनाक पासून):** 20/03/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 20/03/2026
**Time From (वेळेपासून):** 16:47 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 21/03/2026 **Time (वेळ):** 05:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 21/03/2026 05:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय शिरूर ता शिरूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अविनाश बाबासाहेब घरबुडे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9860667770

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महेश बाबुराव भोसले | | | 1. गंगा रेसिडेन्सी बाबुराव नगर ,ता शिरूर जि पुणे,शिरूर,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुरज शरद थोरात | | | 1. शिरुर ता शिरूर जि पुणे,शिरूर, पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
मी अविनाश बाबासाहेब घरबुडे, वय-40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मो नं 9860667770
मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि. 14/03/2026 रोजी सापळा अधिकारी कर्तव्यावर असताना प्रशासन अधिकारी श्री दयानंद गावडे, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी तक्रारदार श्री. प्रशं◌ात गोवर्धन साबळे, वय - 32 वर्षे, मु पो रामलिंग रोड, ता शिरुर, जि पुणे, मो नं – 9673543333यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचेशी संपर्क केला असता त्यांनी त्यांची शिरुर तहसील कार्यालयामधील अभिलेख कक्षातील श्री थोरात साहेब यांचेविरुध्द असलेली तक्रार थोडक्यात कथन केली. परंतु दि. 14/03/2026 रोजी चौथा शनिवार असल्याने व त्यांचे घरात लग्नकार्य असल्याने दि. 18/03/2026 रोजी पुढील कारवाई करणेबाबत विंनती केली. त्याप्रमाणे दि. 18/03/2026 रोजी शिरुर तहसिल कार्यालया, पुणे येथे जवळपास सुरक्षित ठीकाणी भेटुन कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. सदर कारवाई करीता पंच म्हणुन 1) श्री. केदार शिवाजी घोडके, वय - 26 वर्षे, पद - लिपीक टंकलेखक, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालीका, पुणे रा. 567, कमलसुधा अपार्टमेंट, नारायण पेठ, पुणे 10 पंच 2) श्री. अक्षय रुपेश बाबर, वय - 28 वर्षे, पद -लिपीक टंकलेखक, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालीका, पुणे रा. 630, नुतन महाराष्ट्र हौसींग सोसायटी, सहकारनगर, पदमावती, पुणे - 09 हे लेखी पत्र देवुन हे उपलब्ध झाले. कारवाई करीता आम्हास पोशि/95 रवि दिवेकर, पोशि/7364 भुषण ठाकुर, आणि चालक पो ह 330/ काकडे असे पथक उपलब्ध करुन दिले. सर्वाना योग्या त्या सुचना दिल्या. पंच व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एका तक्रारदाराने लोकसेवकाविरुध्द लाचेच्या मागणी संदर्भात तक्रार केली असल्याचे सांगितले व सदर तक्रारीची पडताळणी करावयाची असल्याचे सांगून पडताळणी पंचनाम्याचा उददे◌◌ेश व कारवाई पध्दत समजावून सांगितली. व त्यांना पंच म्हणून काम करण्याची विंनती केली असता त्यांनी पंच म्हणून काम करण्याची स्वखुषीने संमती दर्शविली. पंच व सापळा पथकास दिंनाक 18/03/2026 रोजी 7:30 वा. लाप्रवि कार्यालय, पुणे येथे हजर हाण्याचे आदेशित केले.
दिंनाक 18/03/2026 रोजी पडताळणी व सापळा कारवाईकरीता आवश्यक असलेले सर्व साहित्य घेऊन पंच व पथकासह शासकीय वाहन टियुव्ही क्रं एमएच – 12 - आरवाय – 7271 यामधुन लाप्रवि, पुणे कार्यालयामधुन 07.50 वा. चे सुमारास बाहेर निघुन हडपसर - उरुळी कांचन – चौफुला येथुन डावीकडे वळुन केडगावमार्गे शिरुर जवळील न्हावरा फाटा येथील मेवात ढाबा येथील पार्कींगमध्ये पोहोचलो ती वेळ सकाळी 10.10 वा. ची होती. त्यानंतर मी तक्रारदार यांना संपर्क केला असता 10.35 वा. चे सुमारास सदर ठिकाणी एक इसम त्यांचे दुचाकी वाहनावरुन आले. त्यावेळी मी त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रशांत गोवर्धन साबळे वय 33 वर्षे, रा. रामलींग रोड, घोटीमळा, शिरुर, जि. पुणे असे सांगीतले. त्यानंतर मी , पंचांची तक्रारदार व पथकासोबत एकमेकांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी तक्रारदार यांना त्यांची तक्रार कथन करण्यास सांगीतले असता तक्रार श्री पंशात गावर्धन साबळे यांनी कथन केली ती पुढील प्रमाणे. "वरिल विषयान्वये विंनतीपुर्वक सादर करतो की, मी वरिलप्रमाणे असुन माझी वडीलोपार्जीत घोटीमळा येथे साडेतीन एकर जमीन आहे. सध्या सदर जमीनीमध्ये गहु व इतर गुरांचे खादय पिक घेत आहे. सदर जमीनीचे 7/12 व फेरफार नकला काढायच्या आहे. त्याकरीता मी दि. 27/02/2026 रोजी अभिलेख शाखा तहसिल कार्यालय, शिरुर येथे मा तहसिल साहेबांच्या नावाने 7/12 व फेरफार नकला मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदर अर्जाबाबत चौकशी करण्यासाठी दि 12/03/2026 रोजी अभिलेख कक्ष तहसिल कार्यालय शिरुर येथे गेलो असता, माझी भेट श्री थोरात साहेब यांचेशी झाली त्यांनी मला शासकीय फि व्यतिरीक्त 2000/- रु. दयावे लागतील व मी तुम्हाला सर्व नकला काढुन देतो असे म्हणाले. त्यावर मी

ठिक आहे असे बोलुन माझ्या घरी निघुन गेलो व घरी वडिलांशी चर्चा केली. तरी थोरात यांनी मागणी केलेले 2000/- रुपये ही रक्कम शासकीय फि व्यतिरीक्त असल्याने ती लाच रक्कम असल्याने मला देण्याची इच्छा नाही. जर मी त्यांना लाच रक्कम दिली नाही तर ते मला माझ्या जमिनीचे 7/12 व फेरफार यांच्या नकला देणार नाहीत त्यामुळे मी त्यांच्या विरुध्द लाचलचुपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार देण्याचे ठरविले. आमच्या घरी लग्न कार्य असल्यामुळे ते झाल्यानंतर आजरोजी मी तक्रार देण्याचे ठरविले. तरी माझे व श्री थोरात, अभिलेख कक्ष, शिरुर तहसील कार्यालय यांचेसोबत कोणतेही वैयक्तिक वादविवाद तसेच आर्थिक संबंध नाही. श्री थोरात यांनी मागीतलेली 2000/- रुपये ही लाच रक्कम असल्याने आपल्या विभागामाफत त्यांचेवर कारवाई करावी हि विंनती आहे. " वगैरे मजकुराची तक्रार लिहून दिली नंतर सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रार अर्जासंबधीत असलेल्या लोकसेवकंाकडे पडताळणी बाबत तक्रारदार श्री. साबळे यांचेकडे विचारणा केली असता, तक्रारदार हे सुरज शरद थोरात, तहसिल कार्यालय शिरुर, अभिलेख कक्ष, ता शिरुर, जि पुणे येथे जावुन लोकसेवक श्री थोरात यांना भेटणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे लोकसेवक श्री थोरात यांची भेटघेण्याकरीता तहसिल कार्यालय, ता शिरुर, जि. पुणे येथे पाठवुन लोकसेवक श्री थोरात यांची तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी आहे अगर कसे? याबाबत पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मी तक्रारदार व पंचास शासकीय व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. आणि माझेकडील एक नवीन सिंलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन त्याची पाहणी केली असता, त्यावर सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजुस sandisk ultra 32 GB micro SD HC 1असे व मागील बाजुस 5481 DXACX0FR BM MADE IN CHINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री प्रशांत गोवर्धन साबळे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची त्यांची व पंचाची खात्री करून दिली. तसेच तक्रारदार, पंच यांचे निवेदन घेतेवेळी पो शि ठाकुर/7364 हे शासकीय कॅमेरा मध्ये चित्रिकरण करतील अश्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे एक नविन मायक्रो एस.डी.कार्डचे सिंलबद पॅकिंग उघडुन पंचांना दाखविले असता ते ईव्हीएम कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मायक्रो एस.डी.कार्ड असून त्याचे पुढील बाजुस EVM ELITE 32GB MICRO SD HC 1मागील बाजुस EETF 32GMR0825 0032F 5 A55 W2517044242M असे असल्याचे दिसून आले. सदरचे मेमरीकार्ड शासकीय व्हिडीओ कॅमेरामध्ये इन्सर्ट करण्यात आले. त्यानंतर माझे सुचनेवरुन पो शि क्र 95/दिवेकर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन प्रथम तक्रारदार, व नंतर पंचाचे सापळापुर्व पडताळणी निवेदन ध्वनीमुद्रीत केले. त्याच वेळेस पो शि क्र ठाकुर यांनी निवेदनावेळेचे चित्रिकरण केले. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून माझे ताब्यात ठेवला. आणि तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास सापळापुर्व पडताळणी कारवाई अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर माझे सुचनेनुसार पोशि ठाकुर यांनी व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. साबळे व पंच क्र. 1 श्री. घोडके यांना तक्रारदार यांनी आणलेल्या दुचाकी वाहन क्रं एमएच 12 आर क्यु 3033 वरुन लोकसेवक श्री थोरात यांची भेट घेण्याकरीता अभिलेख कक्ष, तहसिल कार्यालय शिरुर, ता शिरुर, जि पुणे येथे रवाना केले. ती वेळ 12:17 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक शासकीय वाहनामध्ये बसुन सदर ठिकाणी थांबून राहीलो. त्यानंतर साधारणपणे 12:54 वाजण्याचे सुमारास तक्रारदार श्री. साबळे व पंच क्र. 1 श्री. घोडके हे पथक थांबलेल्या ठिकाणी, तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने आले तेव्हा पोशि ठाकुर यांचे मार्फतीने तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून, तो बंद केला. त्यानंतर तक्रारदार यांना रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंचासमक्ष सांगितले कि, "मी व पंच क्र.1 असे आम्ही लोकसेवक श्री सुरज थोरात यांची भेट घेतली असता त्यांनी त्यांचेसमोर कार्यालयातील काही इसम चर्चा करीत होते तेव्हा मी पंचाना इशारा करुन सदर इसम हे लोकसेवक सुरज शरद थोरात हे असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना "ओ थोरात साहेब नमस्ते" असे म्हणालो असता ते मला "शनिवार येणार होते आलेच नाय" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आहो त नेमक सोमवारी बहिणींच लग्न होतं त्याच्यामुळे" असे म्हणालो असता यानंतर पुन्हा आमचेमध्ये चर्चा सुरु असताना थोरात साहेब मला "उदया आहे मी, उदया या" असे म्हणाले असता मी त्यांना "आज, नाही जमायच" अशी विचारणा केली त्यावर ते मला "उदया या" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "ओके ठिक ये चालतंय" असे म्हणालो त्यानंतर मी व पंच घोडके तहसील कार्यालयातुन बाहेर निघुन माझ्या दुचाकी वाहनावरुन पथक थांबले त्याठिकाणी परत आलो. अशी हकिकत दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली. त्यानंतर मी पंच क्रं 1 घोडके यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत माहिती विचारली असता, त्यांनीही तक्रारदार यांनी सांगीतलेप्रमाणेच हकिकत सांगीतली. त्यानंतर मी व्हॉईस रेकॉर्डर मधील पडताळणी कारवाई दरम्यानचे तक्रारदार व थोरात साहेब यांचेमधील

संभाषण आम्हा पंचांसमक्ष फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता, त्यामध्ये तक्रारदार व पंच क्रं 1 यांनी सांगीतलेप्रमाणेच संभाषण मिळुन आले. दि. 19/03/2026 रोजी गुढीपाडव्या निमीत्त शासकीय सुट्टी असल्याने व तहसिल कार्यालय बंद असेल त्यामुळे आपण पुढील कारवाई हि दि. 20/03/2026 रोजी करु असे तक्रारदार यांनी पंचांसमक्ष सांगीतले. त्यावेळी पुढील कारवाई हि दि. 20/03/2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. त्यांनतर तेथुन पंच व सापळा पथक संपुर्ण पथक आम्ही पंच शासकीय वाहनाने सदर ठिकाणाहुन 16.00 वा चे सुमारास निघुन 18.30 वा चे सुमारास लाप्रवि, पुणे कार्यालयात पोहोचलो. सदरचा पंचनामा पुर्ण झालेनंतर मी सापळा पथकास व पंचांना दि. 20/03/2026 रोजी सकाळी 08.30 वा. लाप्रवि, पुणे कार्यालयात हजर राहणेबाबत व गोपनियतेची सुचना दिली

त्या प्रमाणे दिंनाक 20/03/2026 रोजी पडताळणी व सापळा कारवाईकरीता आवश्यक असलेले सर्व साहित्य घेऊन आम्ही पंच व पथक पोनि घरबुडे यांचेसह शासकीय वाहन इरटीगा क्रं एमएच – 12 – युसी – 4109 यामधुन लाप्रवि, पुणे कार्यालयामधुन 08.50 वा. चे सुमारास बाहेर निघुन हडपसर - उरुळी कांचन – चौफुला येथुन डावीकडे वळुन केडगावमार्गे शिरुर जवळील न्हावरा फाटा येथील मेवात ढाबा येथील पार्कीगमध्ये पोहोचलो ती वेळ सकाळी 11.10 वा. ची होती. त्यानंतर तक्रारदार त्यांचे दुचाकी वाहन क्रं एमएच 12 आर क्यु 3033 वरुन 11.30 वा चे सुमारस सदर ठीकाणी आले. दिंनाक 18/03/2026 रोजी वापण्यात आलेलेच मेमरी कार्ड वापरण्याचे ठरवले. त्यांनंतर आलोसे श्री सुरज थोरात हे तक्रारदार यांना लाच मागतात काय हे पाहण्यासाठी पहीले तक्रारदार व पंच याचे निवेदन घेण्यात आले निवेदनाचे व्हीडीओ रेकॉर्डीग्ा करण्यात आले. तक्रारदार यांचे शर्टचे आतुन बनियाना ला व्हाईस रेकॉर्डर मशिन सेफटी पिनचे साहयाने लावुन तो सुरु करुन आलोसे श्री थोरात यांना भेटण्याकरीता अभिलेख कक्ष, तहसिल कार्यालय शिरुर, ता शिरुर, जि पुणे येथे रवाना केले. ती वेळ 12:03 वा. होती काही वेळाने तक्रारदार व पंच श्री घोडके हे आम्ही थांबलेल्या ठीकाणी आले.

तेव्हा तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून, तो बंद केला ती वेळ 12.46 वा ची होती. त्यानंतर तक्रारदार यांना रवाना केलेपासुन परत येईपर्यंत घडलेल्या घटनेबाबत विचारले असता, त्यांनी पंचासमक्ष सांगितले कि, "मी व पंच क्र.1 तिस-या मजल्यावरील स्कॅनींग रुमजवळ गेलो लोकसेवक श्री सुरज थोरात हे स्कॅनींग रुमच्या बाहेरच उपस्थित होते. त्यावेळी मी त्यांना "थोरात साहेब नमस्ते, किती वेळ लागेल" असे विचारले. त्यावर ते मला "तुम्हाला म्हटलो होतो दोनच्या पुढ या" असे म्हणाले. त्यानंतर आमच्यामध्ये माझ्या कामासंदर्भात चर्चा सुरु असताना मी त्यांना "ते नाही का ते डॉक्युमेंट काढायला" असे म्हणालो असता लोकसेवक थोरात मला "हा तुमचच चालु केलय मी, आता तुमचे लय गट ए" असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक थोरात यांना "आ तरी तरी कस करायच" असे बोललो. त्यावर लोकसेवक थोरात मला "दोन पर्यंतर" असे म्हणाले. त्यावर मी लोकसेवक थोरात यांना "दोन हजार?" असे विचारले. त्यावर लोकसेवक थोरात मला "हा" असे म्हणाले. त्यानंतर मी लोकसेवक थोरात यांना "पण ऐका ना, मला जर उदया त्या कोर्टात समजा जर तिथ हे लागल, पावती बिवती लागली, मग त्या पावतीचे काय, पावती व्यतिरीक्त ए का पावती धरुन" असे विचारले. त्यावर लोकसेवक थोरात मला "महेशकडुन काढा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "महेश देईल का दुसर कोण अजुन" अशी विचारणा केली असता, लोकसेवक थोरात मला "चला महेशकडे जाऊ" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "हा चला बर दोन मिनीट" असे म्हणालो. त्यानंतर मी पंच घोडके व लोकसेवक थोरात असे दुस-या मजल्यावरील अभिलेख कक्षाजवळ गेलो. अभिलेख कक्षाच्या खिडकीमधुन लोकसेवक थोरात हे "ओ महेश सर, खिडकीत या एक मिनीट" असे म्हणाले. त्यावेळी खिडकीमध्ये एक इसम आले. त्यावेळी मी त्यांना "महेश सर मि किती दिवस झाले अर्ज देऊन" असे म्हणालो. त्यावर लोकसेवक महेश मला "तुमचे एवढे गट ए ना तुमचे, दुसर बर होत, मला काय तुम्हा हे कराव लागल," असे म्हणाले त्यावर मी लोकसेवक महेश यांना लोकसेवक थोरात यांचेकडे इशारा करत म्हणाले "नाय नाय, ऐका ना, आता हे म्हणले, दोन हजार रुपये दया मला, मी देतो झेरॉक्स काढुन, पण मला सही शिक्क्याचे वेगळे दयावे लागतील का" असे विचारले असता लोकसेवक महेश मला पावतीचे व वरचे पैसे दयावे लागतील तुम्हाला" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "काय होतय, पावतीचे मला वेगळे नका घेऊ आणि हयाचे वेगळे नका घेऊ, मला गरज आहे म्हणुन" असे म्हणालो असता लोकसेवक महेश मला "लय नाय होणार पावतीचे पाचशे रुपयांच्या आतच होणार बघा, ते काय जास्त नाय होणार" "दया काढुन जरा मागे पुढे करा" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना म्हणालो की "डॉकयुमेंन्ट काढून झाल्यावर तुमच्या हयात येवु का "त्यावर ते म्हणाले की "हा ते घेऊन या, मी सही घेऊन येतो वरतुन " त्यानंतर पुन्हा आमच्यामध्ये माझ्या कामासंदर्भात चर्चा झाली त्यानंतर मी व पंच घोडके असे नमुद कार्यालयातुन निघुन खाली पार्कीगमध्ये येऊन माझ्या दुचाकी वाहनावरुन पथक थांबले त्या ठिकाणी पंच घोडके यांना सोबत घेऊन परत आलो. अशी हकिकत दोन्ही पंचासमक्ष सांगीतली. पंच क्र 01 यांनी देखिल तक्रारदार यांनी सांगितल्या प्रमाणे हकीगत सांगितली. त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले असता,

ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच खरे असल्याची खात्री झाली. सदर पडताळणी करावाईवरुन लोकसेवक श्री थोरात व श्री महेश भोसले , तहसिल कार्यालय, पुणे यांनी तक्रारदार प्रशांत साबळे यांना त्याचे वडीलोपार्जित जमिनीचे सातबारा व फेरफार यांचे नकला देणे करीता म्हणुन तडजोडी अंती 2,000/- रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांना लाच रक्कम बाबत विचारणा केली असता त्यांनी 500 रुपये दराच्या 4 नोटा काढुन स्वकामाई चे असुन सदर रक्कम सापळा कारवाई करीता वापरण्याचे ठरवले त्याप्रमाणे पुढील सापळापुर्व, सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. व्हाईस रेकॉर्डर चालु करुन तक्रारदार , पंच यांचे निवेदन घेण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. सदर निवेदनाचे चित्रिकरण करण्यात आले. तक्रारदार श्री. साबळे यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेले 2,000/- रु. रक्कम पंचासमक्ष हजर केली. त्यामध्ये 500/- रूपये दराच्या 4 भारतीय चलनी नोटा असे एकुण 2,000/- रु. असलेचे दिसुन आले. तक्रारदार श्री. साबळे यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500/- नोटांचे नंबर एका को¬-या कागदावर लिहुन घेतले त्यावर मी व पंचानी स्वाक्षरी केली. त्यानंतर शासकीय वाहनात पंच साक्षीदार आणि तक्रारदार यांना अल्ट्राव्हॉयोलेट दिवा(टॉर्च) व अँथ्रासिन पावडर दाखवून कारवाईतील त्यांचे उपयोग व गुणधर्म समजावुन सांगितले तसेच प्रात्याक्षिक करुन दाखवले. तक्रारदार यांनी लाचेकरीता सादर केलेल्या नोटांना अॅथ्रासीन पावडर पो ह 330/ काकडे यांनी लावली. अॅथ्रासिन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार श्री प्रशांत सांबळे यांचे पॅन्टचे समोरील बाजुच्या उजव्या खिशात ठेवल्या.

त्यानंतर तक्रारदार व पंचाना व सापळा पथकास सविस्तर सुचना देवुन लोकसेवक श्री थोरात यांनी लाच स्विकारल्या नंतर कार्यायलयाचे बाहेर आवारात येवुन लाच स्वीकारलेबाबतचा इशारा करणे बाबत तक्रारदार यांना सुचना दिली. त्यांनतर व्हाईस रेकॉर्डर मशिन सुरू करून ते ऐका सेफटी पिनच्या साहयाने तक्रारदार यांचे बनीयानचे आतुन लावुन दिला. तक्रारदार व पंच क्रमांक 01 श्री घोडके यांना लोकसेवक श्री सुरज थोरात यांना भेटण्यासाठी तहसील कार्यालय, ता शिरुर, जि पुणे येथे जाण्याकरीता तक्रारदार यांचे कडील दुचाकी वरुन रवाना केले. त्याचे मागुन मी व सापळा पथक , पंच क्रमांक दोन यांचे सह सरकारी वाहनाने सापळा कारवाई करीता तहसीलदार कार्यालय, ता शिरुर, जि पुणे यांचे कार्यालयाच्या दिशेने 16.17 वा रवाना झालो.

तिसरामाळा , तहासील कार्यालय, ता शिरुर, जि पुणे येथे कार्यालयाच्या परिसरामध्ये पोहोचुन कोणासही संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावुन थांबलो असता तक्रारदार व पंच क्रं 1 हे श्री थोरात बसत असलेल्या तहसीलदार कार्यालयातील 3 -या माळयावर गेले त्या पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र 2 व मी ही गेलो. काहिवेळात तहसील कार्यालय तीसरा माळा, रुम क्र 307 मधुन तक्रारदार, पंच क्रमाक 1 श्री घोडके व एक इसम बाहेर आले व त्यानंतर तक्रारदार यांनी लाच स्वीकारले बाबत इशारा केला. त्याचवेळी पो.अंम. ठाकुर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 16.47 वा ची होती. दिलेल्या सुचना नुसार पो शि दिवेकर यांनी व्ही डी ओ रेकॉर्डींग सुरु केले. मी पंच क्र 1 घोडके यांना लाच रक्कम कोणी स्वीकारली या बाबत विचारणा केली असता त्यांनी रुम नं 307 मधिल एका इसमाकडे इशारा करुन हेच लोकसेवक थोरात असुन यांनीच लाच रक्कम स्वीकारली असल्याचे सांगितले. त्यावेळी पथकाने लोकसेक श्री सुरज थोरात यांना ताब्यात घेतेले. आरोपी लोकसेवक श्री सुरज थोरात हे खुप घाबरलेल्या स्थितीत दिसुन आले. आम्ही त्यांना आमची ओळख सांगुन त्यांचा नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. सुरज शरद थोरात, वय – 34 वर्षे, पद - सुपरवायझर, स्कॅनींग (कंत्राटी), नेम. शिरुर तहसिल कार्यालय, जि. पुणे रा. सेक्टर नंबर 63/132/1ए, नवोदय कॉलनी, चर्च जवळ, लिंक रोड, केडगाव, अहिल्यानगर 05 असे सांगितले. त्यांनतर पंच क्रमांक 1 व तक्रादार यानी सांगितले कि, लोकसवक यांनी त्यांचे उजव्या हाताने लाच रक्कम स्वीकारुन त्यांच्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशात ठेवली. सदरची लाच रक्कम आरोपी इलोसे श्री सुरज थोरात यांनी त्याचे पॅन्टच्या उजव्या खिशातुन काढुन पथकासमक्ष धरली. त्यावेळी माझे सुचनेवरुन पंच क्रं 2 बाबर यांनी सदरची लाच रक्कम ताब्यात घेतली. त्यानंतर ईलोसे श्री. थोरात यांचेकडुन हस्तगत करण्यात आलेल्या लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर हे सापळापुर्व कार्यवाही दरम्यान माझे ताब्यात असलेल्या नोटांचे नंबर लिहलेला कागदावरील नंबर हे एकच आहेत किंवा कसे? याची खात्री करण्याकरीता मी सांगितले असता, पंच क्र.02 श्री. बाबर यांनी सदर हस्तगत नोटांचे नंबर व सापळापुर्व पंचनाम्या दरम्यान कागदावरील लिहलेले नोटांचे नंबर यांची तपासणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. त्यानंतर तहसिल कार्यालयामधील तिस-या मजल्यावरील रुम क्रं 307 मध्ये कृत्रिम अंधार करुन ईलोसे श्री. थोरात यांचे दोन्ही हात तपासले असता त्यांचे दोन्ही हातांचे तळहातावर तसेच बोटांचे पे-यांवर अॅन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली.

मी ईलोसे श्री थोरात यांना लोकसेवक महेश यांचेबाबत विचारणा केली असता, ईलोसे यांनी महेश भोसले हे दुस-या

मजल्यावरील अभिलेख शाखेमध्ये असलेबाबत सांगीतले. त्यावेळी मी व पंच क्रं 1 असे दुस-या मजल्यावरील अभिलेख शाखेमध्ये गेले. त्यावेळी तेथे लोकसेवक महेश भोसले यांना ताब्यात घेऊन पुन्हा तिस-या मजल्यावरील रुम नं 307 मध्ये आले. त्यावेळी मी इलोसे श्रीभोसले यंाना ओळख सांगुन त्यांचेवर झालेल्या कारवाईची माहिती दिली व लोकसेवक भोसले यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता - त्यांनी त्यांचे नाव श्री. महेश बाबुराव भोसले, वय - 45 वर्षे, खाजगी ईसम रा. गंगा रेसिडेन्सी, फलॅट नं सी 402, शिरुर, पुणे असे सांगितले
दोन्ही आरोपींना सापळा करवाईचा उददेश समाजवून सांगुन सापळा पथकासह पुढील कार्यावाही करता शिरुर पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले. आम्ही तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी व पंच क्र 1 श्री घोडके लोकसेवक सुरज थोरात यांचे कार्यालयात गेलो असता श्री थोरात साहेब उपस्थित होते. मी आतमध्ये गेल्यावर थोरात साहेब मला "नाय नाय चालु ए ते" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "किती वेळ लागण" अशी विचारणा केली असता ते मला "नाही ना काढतोय ना अजुन, लाईट गेली" असे म्हणाले त्यावर मी त्यांना "थांबु का, मग काय करु, जाऊ" अशी विचारणा केली. त्यानंतर आमचेमध्ये पुन्हा माझ्या प्रलंबीत कामासंदर्भात चर्चा सुरु असताना मी पेंमेन्ट आणले असल्याचे सांगितले त्यावर ईतर लोकसेवक थोरात यांनी मला "बर दया दया दया" असे म्हणाले त्यावेळी मी माझ्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशातुन उजव्या हाताने लाच रक्कम काढुन ईलोसे थोरात यांचेसमोर धरली. त्यावेळी ईलोसे थोरात यांनी सदरची लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली व ते त्यांचे रुममध्ये गेले त्यावेळी मी पथकास लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत ईशारा केला. त्यावेळी पथकाने येऊन ईलोसे यांना ताब्यात घेतले. अशी हकिकत दोन्ही पंचांसमक्ष सांगीतली.त्यानंतर पंच क्र. 1 श्री. घोडके यांना घडलेला घटनाक्रम विचारला असता, त्यांनी तक्रारदार यांचेप्रमाणेच हकिकत सांगितली. सदरबाबत सविस्तर पंचनामे करण्यात आलेले आहेत.
तरी इतर लोकसेवक श्री सुरज शरद थोरात, वय – 34 वर्षे, पद - सुपरवायझर, स्कॅनींग (कंत्राटी), नेम. शिरुर तहसिल कार्यालय, जि. पुणे रा. सेक्टर नंबर 63/132/1ए, नवोदय कॉलनी, चर्च जवळ, लिंक रोड, केडगाव, अहिल्यानगर 05 यांनी तक्रारदार यांचे वडीलोपार्जित जमिनीचा सातबारा व फेरफार याचे नकला देण्याकरीता म्हणुन 2,000/रू लाच रकमेची मागणी करून दिनाक 20/03/2026 रोजीचे पडताळणी दरम्यान पंचासमक्ष तडजोडीअंती 2,000/रू लाचेची मागणी करून ती स्वीकारण्याचे कबूल केले व श्री. महेश बाबुराव भोसले, वय – 45 वर्षे, खाजगी ईसम रा. गंगा रेसिडेन्सी, फलॅट नं सी 402, शिरुर, पुणे यांनी तक्रारदार याचे वडीलो पार्जित जमिनीचा सातबारा व फेरफार याचे नकला देण्याकरीता तक्रारदार यांना 2000/- लाच रक्कम दयावी लागेल व त्यानंतर ैमी सदर नकलावर सहया घेवुन येतो वरतुन" असे म्हणुन आपला प्रभाव पाडुन लाच देण्यास प्रात्साहन दिले आहे.
दिंनाक 20/03/2026 रोजी 16.47 वा सुमारास इतर लोकसेवक श्री सुरज शरद थोरात, वय – 34 वर्षे, पद - सुपरवायझर, स्कॅनींग (कंत्राटी), नेम. शिरुर तहसिल कार्यालय, जि. पुणे रा. सेक्टर नंबर 63/132/1ए, नवोदय कॉलनी, चर्च जवळ, लिंक रोड, केडगाव, अहिल्यानगर 05 यांनी रुम नं 307,तीसरामाळा, तहसील कार्यालय शिरुर, ता शिरुर जि पुणे येथे पंचासमक्ष तक्रारदार यांचे वडीलोपार्जित जमिनीचा सातबारा व फेरफार याचे नकला देण्याकरीता 2,000/रूपये लाच रक्कम स्वीकारली व आपल्या पदाचा दुरूपयोग केला म्हणुन माझी श्री सुरज शरद थोरात, वय – 34 वर्षे, पद - सुपरवायझर, स्कॅनींग (कंत्राटी), नेम. शिरुर तहसिल कार्यालय, जि. पुणे व खाजगी इसम श्री. महेश बाबुराव भोसले, वय – 45 वर्षे, खाजगी ईसम रा. गंगा रेसिडेन्सी, फलॅट नं सी 402, शिरुर, पुणे याचेविरुदध भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 चे कलम 7अ, 12 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर तक्रार आहे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

SANDESH ARUN KENJALE(I (Inspector)) / **or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**

**Rank** (पद)**:** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

3100854

15. **Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस ठाणे अंमलदार
शिरूर पोलीस स्टेशन पुणे ग्रा.

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** SANDESH ARUN KEN
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)